पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक ८

**सभावृत्तांत**

दिनांक - २०/०९/२०१३ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक २०/०९/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहुल - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा. प्रशांत शितोळे
६) मा. शितोळे शैलजा बाबुराव
७) मा. काळजे नितीन प्रताप
८) मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
९) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.गावडे – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१४) सन २०१३-१४ अर्थसंकल्पातील प्रभाग क्र.५९ ..... मा.किरण मोटे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१५) प्रभाग क्र.४ कृष्णानगर अंदाजपत्रकीय विकासकामे .... मा.किरण मोटे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१६) सांगवी वॉर्ड क्र.६० .... मा.प्रशांत शितोळे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१७) प्रभाग क्र.४ कृष्णानगर अंदाजपत्रकीय विविधकामे .... मा.किरण मोटे, मा.नितीन काळजे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१८) सन २०१३-१४ अर्थसंकल्पातील प्रभाग क्र.५५ ... मा.प्रशांत शितोळे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१९) प्रभाग क्र.१३ मधील पिंपळे सौदागर, रहाटणी ... मा.प्रशांत शितोळे, मा.नितीन काळजे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२०) क प्रभागातील वॉर्ड क्र.१४ सदगुरुनगर (नि.नो.क्र.२९/३४-२००७-०८) ... मा.वैशाली काळभोर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२१) क प्रभागातील वॉर्ड क्र.१४ सदगुरुनगर (नि.नो.क्र.१०/११७-२००७-०८) ...
मा.वैशाली काळभोर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.प्रशांत शितोळे    अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर

शुक्रवार दिनांक २७/०९/२०१३ दुपारी ३.०० वा. पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** – शुक्रवार दिनांक २७/०९/२०१३ दुपारी ३.०० वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक ८

**सभावृत्तांत**

( दिनांक २०/०९/२०१३ ची तहकूब सभा )

दिनांक - २७/०९/२०१३ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची दिनांक २०/०९/२०१३ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक २७/०९/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहुल - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा. प्रशांत शितोळे
६) मा. शितोळे शैलजा बाबुराव
७) मा. काळजे नितीन प्रताप

याशिवाय मा.झुरे – सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.खांडकेकर – सहा.आयुक्त, मा.थोरात – कार्यकारी अभियंता, मा.पवार – कार्यालय अधिक्षक, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक १६/०८/२०१३, २३/०८/२०१३ व ०६/०९/२०१३ रोजी झालेल्या (कार्यपत्रिका क्र.६) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ०६/०९/२०१३ रोजी झालेल्या (कार्यपत्रिका क्र.७) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : ७४ विषय क्रमांक : १

दिनांक : २७/०९/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा. शैलजा शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/१/कावि/९४१/२०१३, दि.१६/०७/२०१३

विषय - श्री. सतिश कुलकर्णी, मुख्य अधिकारी गट अ यांचे सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील मुदतवाढीबाबत ....

विषय क्रमांक १ चा विचार दि.०१/११/२०१३ चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७५ विषय क्रमांक : २

दिनांक : २७/०९/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा. वैशाली काळभोर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/१/कावि/९४२/२०१३, दि.१६/०७/२०१३

विषय - श्री. ज्ञानेश्वर ढेरे, मुख्याधिकारी श्रेणी-१ यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील मुदतवाढीबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार दि.०१/११/२०१३ चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक : ७६ विषय क्रमांक : ३

दिनांक : २७/०९/२०१३ विभाग : स्थापत्य प्रकल्प

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा. साधना जाधव

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्थाप्रकल्प/जा/कावि/५२१/१३, दि.१९/०७/१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुंबई पुणे रस्त्यावर दापोडी ते पिंपरी चौक कर्ब स्टोन, फुटपाथ, रस्ता दुभाजक इ.देखभाल दुरुस्ती करणे या उपलेखाशिर्षाखाली दापोडी ते निगडी मार्गदर्शक फलक बसविणे व दुरुस्ती करणेकामीचे र.रु.४०,००,०००/-( अक्षरी र.रु.चाळीस लाख फक्त ) पर्यंतचे पुर्वगणनपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७७ विषय क्रमांक : ४

दिनांक : २७/०९/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा. नितीन काळजे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/१/कावि/१०४७/२०१३, दि.०३/०८/२०१३

विषय - श्री. गायकवाड भानुदास पांडूरंग, उपजिल्हाधिकारी यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील नियुक्तीबाबत.

विषय क्रमांक ४ चा विचार दि.०१/११/२०१३ चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७८ विषय क्रमांक : ५

दिनांक : २७/०९/२०१३ विभाग : स्थापत्य प्रकल्प

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा. वैशाली काळभोर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्थाप्रकल्प/जा/कावि/५४९/१३, दि.३१/०७/१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुंबई पुणे रस्ता दापोडी ते पिंपरी चौक कर्ब स्टोन, फुटपाथ, रस्ता दुभाजक इ. देखभाल व दुरुस्ती करणेचे र.रु.३५,००,०००/- (अक्षरी र.रु.पस्तीस लाख फक्त ) पर्यंतचे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ७९ विषय क्रमांक : ६
दिनांक : २७/०९/२०१३ विभाग : प्रशासन
सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा. साधना जाधव
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/१/कावि/८११/२०१३, दि.२१/०६/२०१३

विषय : श्री. प्रमोद भीमराव भोसले, उपसंचालक वित्त व लेखा सेवा (वरिष्ठ) गट अ यांचे मुख्यलेखापाल पदावर प्रतिनियुक्तीने केलेल्या नियुक्तीस मुदतवाढ मिळणेबाबत..

विषय क्रमांक ६ चा विचार दि.०१/११/२०१३ चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८० विषय क्रमांक : ७
दिनांक : २७/०९/२०१३ विभाग : अ प्रभाग स्थापत्य
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.शैलजा शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.अप्र/स्था/३/१४९२/२०१३, दि.१३/०८/२०१३

विषय : निगडी येथील गुरुदत्त उद्यानाचे नुतनीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८१ विषय क्रमांक : ८
दिनांक : २७/०९/२०१३ विभाग : स्थापत्य बीआरटीएस
सुचक : मा.नितीन काळजे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/बीआरटीएस/५९७/१३, दि.२२/०८/२०१३

विषय : जुन्या मुंबई – पुणे रस्त्यावरील भक्ती शक्ती चौक येथे बस टर्मिनल विकसीत करणेबाबत..

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८२ विषय क्रमांक : ९
दिनांक : २७/०९/२०१३ विभाग : स्थापत्य बीआरटीएस
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.किरण मोटे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/बीआरटीएस/६०३/१३, दि.२६/०८/२०१३

विषय : औंध रावेत रस्त्यावरील मुकाई चौक येथे बस टर्मिनल विकसीत करणेबाबत.

विषय क्र.९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८३ विषय क्रमांक : १०
दिनांक : २७/०९/२०१३ विभाग : विद्युत मुख्य
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.शैलजा शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.सशअ/३१५/२०१३, दि.२७/०८/२०१३

विषय : पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतिक व कला धोरणाबाबत..

विषय क्र. १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८४ विषय क्रमांक : ११
दिनांक : २७/०९/२०१३ विभाग : भूमि आणि जिंदगी
सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.किरण मोटे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.भूजि/१/कावि/३४८/२०१३, दि.०३/०९/२०१३

विषय : पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिळकतवाटप नियमावली २०१३ मान्यतेबाबत.

विषय क्र. ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८५ विषय क्रमांक : १२
दिनांक : २७/०९/२०१३ विभाग : विद्युत भुगयो
सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे
संदर्भ : मा.सह शहर अभियंता यांचेकडील क्र.वि/भुगयो/तां/१८६/२०१३, दि.०२/०९/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी मेन पंपहाऊस येथे अधिक क्षमतेचे इलेक्ट्रीक हॉईस्ट बसविणेकामी येणा-या र.रु.१२,५०,०००/- (अक्षरी र.रु.बारा लाख पन्नास हजार फक्त) चे पुर्वगनणपत्रकास प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८६ विषय क्रमांक : १३
दिनांक : २७/०९/२०१३ विभाग : विद्युत भुगयो
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.साधना जाधव
संदर्भ : मा.सह शहर अभियंता यांचेकडील क्र.वि/भुगयो/१८९/२०१३, दि.०३/०९/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपळे सौदागर पंपहाऊस येथे अधिक क्षमतेचे इलेक्ट्रीक हॉईस्ट बसविणेकामी येणा-या र.रु.११,६१,०००/- (अक्षरी र.रु.अकरा लाख एकसष्ट हजार फक्त) चे पुर्वगनणपत्रकास प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ८७ विषय क्रमांक : १४

दिनांक : २७/०९/२०१३

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.किरण मोटे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात स्थापत्य उद्यान यामधील खालील नमुद स्थापत्य उद्यान विषयक कामांना मूळ अंदाजपत्रकात तरतुद उपलब्ध आहे. तथापि या कामाचे सल्लागार यांचेकडून विषयांकित उद्यान विकसित करणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असता सांगवी आरक्षण क्र.३१६ उद्यान विकसित करणे या कामाकरीता अंदाजे र.रु.५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. तरी यापूर्वी टप्पा क्र.१ मध्ये या उद्यानास सिमाभिंत बांधणे व सदर उद्यानाचे स्थापत्य विषयक विकास कामे करणे याकरिता निविदा कार्यवाही चालू आहे. तरी या कामाकरिता उर्वरित टप्पा २ मधील सदर उद्यान विकासित करणेकरिता आवश्यक असलेली अंदाजपत्रकीय र.रु.३ कोटीचे खर्चास मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. आरक्षण क्र.३१६ उद्यान विकसित करणेसाठी खाजगी जागा मालकाकडून १०० टक्के जागेचा ताबा मनपाकडे आलेला आहे. तरी उद्यान विकसित करणेसाठी आवश्यक असलेली अंदाजपत्रकीय रक्कम रु.३ कोटीच्या अंदाजपत्रकीय रकमेस मान्यता मिळणेसाठी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठंराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

| अ.क्र. | कामाचे नांव | प्रभाग क्र. | पान क्र. | अ.क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१२-१३ ची सुधारित तरतूद | सन २०१३-१४ ची मुळ तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांगवी येथील मधूनबन सोसायटी आरक्षण क्र.३१६ सर्वे नं.२६ब येथे उद्यान विकसित करणे. | ५९ | ४६९ | १६२ | ३००००००००/- | ----- | ५००००००००/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८८ विषय क्रमांक : १५

दिनांक : २७/०९/२०१३

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.किरण मोटे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.४ कृष्णानगर येथील सन २०१३-१४ चे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कामातून १) प्र.क्र.४ कृष्णानगर येथील से.नं.२० मधील मोकळी जागा प्लॉट क्र.५ ऐवजी प्लॉट क्र.३ येथे आर.सी.सी.सिमाभिंत व जॉगिंग ट्रॅक करणेस, २) प्र.क्र.४ सी.डी.सी. प्लॉट

क्र.१ येथे स्केटींग ग्राउंड व प्रोकलेक्स शेड करणे ऐवजी सदर ठिकाणी ग्राऊंड सभोवती नागरिकांचे सोयीसाठी जॉगिंग ट्रॅक करणेस (दोन्ही कामांमधून), ३) प्राधिकरण से.क्र.१८ शिवतेजनगर मधील मोकळी जागा क्र.१ ते ३ येथे उद्यान विकसित करणे, ४) प्राधिकरण चिखली डिस्ट्रीक सेंटर मधील मोकळी जागा क्र. १, २ व ३ येथे उद्यान विकासित करणे पा. क्र.३ व ४ कामांऐवजी तरतूद एकत्र करुन प्राधिकरण चिखली डिस्ट्रीक सेंटरमधील मैदानाचे सपाटीकरण करुन उद्यान विकसित करणेस, ५) से.नं.२० प्लॉट नं.५ मध्ये जेष्ठ नागरिकांसाठी असलेले विरंगुळा केंद्र प्रभागस्तरीय कामातून बंदिस्त करुन सुविधा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८९ विषय क्रमांक : १६

दिनांक : २७/०९/२०१३

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.प्रशांत शितोळे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने मौजे सांगवी येथे प्र.क्र.६० सांगवी गावठाण संगमनगर व परिसरामध्ये रस्ते विकसित करणे, फुटपाथ करणे, जलनि:सारण, विद्युत व पाणी पुरवठा विषयक कामे एकत्रितरित्या करणेबाबत मा.आयुक्त यांनी परवानगी दिली आहे तरी सदर कामाचे अंदाजपत्रकीय र.रु.६.०० कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता घेणेस व चालू आर्थिक वर्षातील तरतूद र.रु.२.०० कोटी या कामासाठी उपलब्ध असून उर्वरित रक्कम पुढील आर्थिक वर्षात खर्ची टाकणेस व सर्व काम एकत्रितरित्या करणेकामी अंदाजपत्रक २०१३ पान क्र.३६९/६ मध्ये सुधारणा करुन घेणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९० विषय क्रमांक : १७

दिनांक : २७/०९/२०१३

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.नितीन काळजे

संदर्भ : मा.किरण मोटे, मा.नितीन काळजे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.४ कृष्णानगर येथील सन २०१३-१४ चे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कामातून १) प्र.क्र.४ कृष्णानगर येथील से.नं.२० मधील मोकळी जागा प्लॉट क्र.५ ऐवजी प्लॉट क्र.३ येथे आर.सी.सी.सिमाभिंत व जॉगिंग ट्रॅक करणेस, २) प्र.क्र.४ सी.डी.सी. प्लॉट क्र.१ येथे स्केटींग ग्राउंड व प्रोकलेक्स शेड करणे ऐवजी सदर ठिकाणी ग्राऊंड सभोवती नागरिकांचे सोयीसाठी जॉगिंग ट्रॅक करणेस (दोन्ही कामांमधून), ३) प्राधिकरण से.क्र.१८ शिवतेजनगर मधील मोकळी जागा क्र.१ ते ३ येथे उद्यान विकसित करणेस, ४) प्राधिकरण चिखली डिस्ट्रीक सेंटर मधील मोकळी जागा क्र. १, २ व ३ येथे उद्यान विकासित करणे पा. क्र.३ व ४ कामांऐवजी तरतूद एकत्र करुन प्राधिकरण चिखली डिस्ट्रीक सेंटरमधील मैदानाचे सपाटीकरण करुन उद्यान विकसित करणेस, ५) से.नं.२० प्लॉट नं.५ मध्ये जेष्ठ नागरिकांसाठी

असलेले विरंगुळा केंद्र प्रभागनिहाय कामातून बंदिस्त करुन सुविधा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९१ विषय क्रमांक : १८

दिनांक : २७/०९/२०१३

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.साधना जाधव

संदर्भ : मा.प्रशांत शितोळे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव -

सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात विशेष योजना या लेखाशिर्षातील खालील नमुद स्थापत्य विषयक कामांना मुळ अंदाजपत्रकात तरतूद उपलब्ध आहे. तथापि अंदाजपत्रकीय रकमेस मा.महापालिका सभेची प्रशासकीय मंजूरी मिळणे आवश्यक आहे. पिंपळे सौदागर येथील रक्षक चौकाकडे जाणारा रस्ता संरक्षण विभाग अचानक बंद करु शकते सर्वे नं.५९ ते १२१ पर्यंत संरक्षण हद्दीलगत १८.०० मी. रुंदीच्या डी.पी.रस्त्यासाठी ७० टक्के पेक्षा जास्त जागा ताब्यात आलेली आहे. सदर कामासाठी र.रु.८,७०,००,०००/- च्या अंदाजपत्रकीय रकमेस मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. पिंपळे सौदागर येथील मनपा शाळा ते रक्षक चौकापर्यंतचा अस्तित्वातील २०.०० मी. रुंद डी.पी.रस्ता रुंदीकरण करुन विकसित करणेसाठीच्या र.रु.१,५०,००,०००/- च्या अंदाजपत्रकीय रकमेस मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. तसेच आरक्षण क्र.३७१ ब येथे उद्यान विकसित करणेसाठी खाजगी जागा मालकाकडून ७० टक्के पेक्षा अधिक जागेचा ताबा मनपाकडे आलेला आहे. उद्यान विकसित करणेसाठीच्या ३ कोटीच्या अंदाजपत्रकीय रकमेस मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. स्थापत्य विशेष योजना अंतर्गत प्रभाग क्र.५५ पिंपळे सौदागर येथील खालील नमुद केलेली कामे करणेकरीता अंदाजपत्रकीय रकमेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | प्रभाग क्र. | पान क्र. | अ. क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१२-१३ ची सुधारित तरतूद | सन २०१३-१४ ची मुळ तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | प्रभाग क्र.५५ पिंपळे सौदागर येथील सर्वे नं.५९ ते सर्वे नं.१२१ पर्यंत संरक्षण हद्दीलगत १८.९९ मी. रुंद डी.पी. रस्ता विकसित करणे. | ५५ | २८ | ८७ | ८,७०,००,०००/- | ----- | २०,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र.५५ पिंपळे सौदागर येथे मनपा शाळा ते रक्षक चौकापर्यंतच्या २०.०० मी. रुंद डी.पी. रस्ता विकसित करणे. | ५५ | २८ | ८९ | १,५०,००,०००/- | ----- | २५,००,०००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पिंपळे सौदागर आरक्षण क्र.३७१ ब येथे उद्यान विकसित करणे.(५ एकरावर उद्यान विकसित करणे) (भाग २) | ५५ | ४५९ | ३९ | ३,००,००,०००/- | ----- | ५०,००,०००/- |
| | एकूण रक्कम रुपये - | | | | १३,२०,००,०००/- | ----- | ९५,००,०००/- |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९२ विषय क्रमांक : १९

दिनांक : २७/०९/२०१३

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.नितीन काळजे

संदर्भ : मा.प्रशांत शितोळे, मा.नितीन काळजे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.१३ मधील पिंपळे सौदागर, रहाटणी परिसरातील जुन्या पाईपलाईन काढून नविन पाईप लाईन टाकणेच्या कामाकरिता झालेल्या र.रु.२,३०,४०,०००/- चे खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९३ विषय क्रमांक : २०

दिनांक : २७/०९/२०१३

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.वैशाली काळभोर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

क प्रभागातील वॉर्ड क्र.१४ सदगुरुनगर येथे ठिकठिकाणी स्ट्रॉम वॉटरलाईन टाकणे (नि.क्र.२९/३४-२००७-०८) कामात सदगुरुनगर येथील इंद्रायणी मंगल कार्यालयाच्या आतील बाजूने पुणे-नाशिक रस्त्यापर्यंत स्ट्रॉम वॉटरलाईन टाकण्याचे अंदाजपत्रक तयार केले होते परंतु सदर मंगल कार्यालयामधून जागा मालक श्री.गवळी यांनी स्ट्रॉम वॉटरलाईन टाकणेस नकार दिला त्यामुळे सदर कामातून चक्रपाणी वसाहत सदगुरुनगर भागात ठिकठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे, मुरुम टाकणे व स्थापत्य विषयक कामे करण्यात आलेली आहेत. तसेच सदरचा भाग हा बहुतांश रेडझोनचा परिसर असल्याने सदरच्या कामाच्या शिल्लक रकमेतून वॉर्ड क्र.२२ लांडेवाडी वॉर्ड क्र.१९ गव्हाणेवस्ती भागात पेव्हींग ब्लॉक बसविणेत आलेले आहेत सदरची कामे उपरोक्त कामातून करणेत आलेली असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९४ विषय क्रमांक : २१

दिनांक : २७/०९/२०१३

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.वैशाली काळभोर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

क प्रभागातील भोसरी वॉर्ड क्र.१४ सदगुरुनगर येथील रस्ते खडी मुरुमाचे करुन बी.बी.एम. पध्दतीने डांबरीकरण करणे (नि.क्र.१०/११७-२००७-०८) कामातून सदगुरुनगर येथील रस्त्याची कामे झाली असून निविदा रक्कम शिल्लक असल्याने वॉर्ड क्र.१९ मधील गव्हाणेवस्तीमधील महात्मा फुले शाळेजवळील डी.पी.रस्त्याचे रुंदीकरण करणे, वॉर्ड क्र.२३ मधील बापुजी बुवा चौक ते शांतीनगर कॉर्नर पर्यंत १२ मी. रस्त्याचे रुंदीकरण करणे तातडीचे असल्याने या कामातून करणेत आलेले आहे. तरी क प्रभागातील भोसरी वॉर्ड क्र.१४ सदगुरुनगर येथील रस्ते खडीमुरुमाचे करुन बी.बी.एम.पध्दतीने डांबरीकरण करण्याचे कामातून वॉर्ड क्र.१९ गव्हाणेवस्ती मधील महात्मा फुले शाळेजवळील डी.पी.रस्त्याचे रुंदीकरण, वॉर्ड क्र.२३ मधील बापुजी बुवा चौक ते शांतीनगर कॉर्नर पर्यंतचा १२ मी. रस्त्याचे रुंदीकरणे करण्याचे कामास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(जवळकर वैशाली राहुल)

**सभापती**

मा. विधी समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय

क्रमांक - नस/४/कावि/ ९१० /२०१३

दिनांक - २७/०९/२०१३

**कार्यालय अधिक्षक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.